माहितीचा अधिकार

महानगरपालिका मार्ग,
मुंबई – 400 001
दूरध्वनी क्र.22754252
क्र. एमजीसी/एफ/3977
दिनांक: 21/08/2024

प्रति,
श्री.कमलाकर रत्नाकर शेनॉय
बी-903, वैशाली अपार्टमेंट,
एमटीएनएल एक्स्चेंजच्या समोर,
शेठ मोठिशा (लव) लेन, माझगांव,
मुंबई – 400010.
मो.नं.9870987359.

विषय – माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत माहिती मिळणेबाबत
आपला दि.08.08.2024 रोजीचा अर्ज.
संदर्भ: क्र.एमआयआर/6429 दि.08.08.2024

महोदय,

आपला उपरोक्त अर्ज जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (आयुक्तांचे कार्यालय) यांजकडून ह्या कार्यालयात दि.12.08.2024 रोजी प्राप्त झाला.

माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मधील कलम 5(1)19(1) अन्वये जनतेला माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने खातेस्तरावर/विभागस्तरावर जन माहिती अधिकारी/अपिलीय अधिकारी नियुक्त केलेले आहेत. त्यांची माहिती महानगरपालिकेच्या www.mcgm.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. आपल्या उपरोक्त अर्जामधील नमूद विषयाच्या अनुषंगाने ह्या कार्यालयाशी संबंधित माहिती खालीलप्रमाणे:-

| अ.क्र. | अर्जदाराने मागितलेली माहिती | जन माहिती अधिकाऱ्याचे अभिप्राय |
|---|---|---|
| 9 | a) Confirmation required that circular dt.7.1.2000 is still in force and the same is not revoked and cancelled.<br>b) Confirmation that circular dt. 8.4.24 does not prevent any citizens from meeting the above public servants on working days. | नागरिकांना संबंधित अधिकारी / खाते प्रमुख यांना भेटण्याची वेळ निश्चितीकरिता रचना व कार्यपध्दती अधिकारी (आयुक्त कार्यालय) सामान्य प्रशासन विभाग यांचेमार्फत क्र.एमओएम/1653 दि.07.01.2000 रोजी परिपत्रक वितरीत केले. सदर परिपत्रक स्वयंस्पष्ट आहे.<br>यव्यतिरिक्त मा. महानगरपालिका आयुक्त कार्यासनाकडून दि.08.04.2024 रोजी क्र.एमजीसी/ए/4937 अन्वये जनतेच्या तक्रारी ऐकून घेण्यासाठी वार व वेळ निश्चित करण्यात आल्याबाबत विद्यमान मा. महानगरपालिका आयुक्त यांनी सर्व संबंधितांना निर्देशित केले आहे. मा. महानगरपालिका आयुक्तांच्या निर्देशामध्ये दि.07.01.2000 रोजीचे परिपत्रक रद्द बातल केल्याचा उल्लेख दिसून येत नाही. |

**याद्वारे आपला माहिती अधिकारांतर्गत केलेला अर्ज या कार्यालयापुरता निकाली काढण्यात येत आहे.**

उपरोक्त माहितीने आपले समाधान न झाल्यास, व आपणास अपिल करावयाची ईच्छा असल्यास आपण अपिलीय अधिकारी तथा सह प्रमुख कर्मचारी अधिकारी (सर्वसाधारण) यांच्याकडे खालील पत्यावर विहित कालावधीत अपिल करु शकता:-

**<u>अपिलीय अधिकारी:</u>**

श्रीम. सुजाता वारीक,

सह प्रमुख कर्मचारी अधिकारी (सर्वसाधारण), प्रमुख कर्मचारी अधिकारी यांचे कार्यालय,

6 वा मजला, महापालिका विस्तारीत इमारत,

महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई - 400 001.

आपला विश्वासू,

21/8/24

(आनंद सो. भवार)

**जन माहिती अधिकारी तथा**

**आयुक्तांचे स्वीय चिटणीस**